!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४६३ २२-२-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

## प्रतिक्रिया

## सर्वांसाठी लाभदायी अर्थसंकल्प

अर्थमंत्र्यांनी सादर केलेले बजेट देशातील शेतकरी, शेती महिला आणि मध्यवर्गीयासाठी खुप चांगले आहे. या बजेटमध्ये शेतकरी, कृषी क्षेत्रासाठी अनेक योजना जाहीर झाल्या आहेत. ३५९८४ कोटी रुपयांच्या कार्यक्रमांची घोषणा केली गेली. सिंचन, मृदा समृध्दी, बाजारपेंठाना जोडणारे रस्ते यासाठी बजेट मध्ये प्रावधान केलेले आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेला मजबुत करण्याचे ध्येय ठेवण्यात आले असुन २८.५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याचे लक्ष आहे. मनरेगामधुन ५ लाख शेततळे बवण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे. १८,५४२ गावांकडे विद्युतीकरणासाठी १००० दिवसांचे लक्ष ठेवण्यात आले असुन डिजीटल साक्षरता मिशन या योजनेमुळे ग्रामीण भागातील संगणक साक्षरता वाढवल्यास मदत होईल. द्रारिद्रेषेखालील महिलांना एलपीजी गॅस कनेक्शन देण्यासाठी २००० कोटींची योजना आहे यास दोन वर्षात ५ कोटी बीपीएल परिवाराला एलपीजी कनेक्शन दिल्या जाणार आहे.

गरीबांसाठी सरकारने एक लक्ष रुपयांची आरोग्य विम्याचा घोषणा केली आहे. यासोबतच पीपीपी तत्वावर जिल्हा रुग्णालयात डायलेसीसची सुविधा उपलब्ध करुन दिल्या जाणार आहे. उच्च शिक्षणासाठी सुलभ कर्ज मिळण्यासाठी उच्च शिक्षिण कर्ज केंद्राची सुरुवात केली जाणार आहे.

शाळांचे प्रमाणपत्र डिजीटल स्वरुपात उपलब्ध होणार असल्याने विद्यार्थ्यांची धावपळ टाळणार आहे. त्यासाठी डिजीटल डिपॉजीटर सुरु होणार आहे. त्यामुळे नोकरी देणाऱ्या संस्था व उच्च शिक्षणाचे केंद्र त्याला बघू शकतील अशी सुविधा असणार आहे. प्रत्येकाला घर उपलब्ध करुन देण्याची योजना सरकारने आणली आहे.त्यामुळे सर्वसामान्य व गरीबांसाठी लाभदायी अर्थसंकल्प सादर झाला आहे.

या बजेटने सर्व वर्गातील लोकांना काही ना काही दिल्याने सर्वार्थाचे चांगले बजेट म्हणावी लागेल. उच्चवर्गीय आणि गुंतवणुकदारांची निराशा झाली असली तरी सर्वांसाठी चांगले बजेट आहे.

**आपला**

**चंद्रकांत खैरे**
खासदार तथा शिवसेना उपनेते लोकसभा मुख्य प्रतोद
(शिवसेना)

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525